# सुचना

<u>विषय- सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिप २०१७-१८ योजनेबाबत</u>

वरील विषयासंदर्भात सर्व विद्‌यार्थ्यांना कळविण्यात येते की, <u>सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिप २०१७-१८ योजनेचे</u> फॉर्म दि. २३/१०/२०१७ पर्यंत कॉलेज मध्ये जमा करावेत.

विद्‌यार्थ्यांचे नवीन अर्ज तसेच प्रथम व व्दितीय नूतनीकरणाचे अर्ज (Fresh & 1st & 2nd Renewal) हे ऑनलाईन पद्धतीने व तृतीय व चतुर्थ नुतरणीकरणाचे अर्ज (3rd & 4th Renewal) ऑफलाईन पद्धतीने करावेत.

प्रबंधक

SARDAR PATEL COLLEGE OF ENGINEERING
ANDHERI MUMBAI

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
### महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१२२१५३


क्र.उशिसं-२०१७/सीएसएस/शिष्यवृत्ती/ १०६९३ दि. ०६/०९/२०१७

7 SEP 2017.

**परिपत्रक** NO.REG/ICD/2017-18/783

**विषय :-** १०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती ची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०१७-१८ साठी अंमलबजावणी करणे बाबत...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे फेब्रुवारी / मार्च २०१७ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण, संचालनालय, पुणे यांचेमार्फत राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. सदर योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन मंजूरी तसेच प्रथम व द्वितीय नूतनीकरणाचे अर्ज (Fresh & 1st & 2nd Renewal) हे ऑनलाईन पध्दतीने व तृतीय व चतुर्थ नूतनीकरणासाठी (3rd & 4th Renewal) अर्ज ऑफलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

<u>नवीन मंजूरी तसेच प्रथम व द्वितीय नूतनीकरण (Online Renewal)</u> -

१) शिष्यवृत्तीच्या नवीन मंजूरी तसेच प्रथम व द्वितीय नूतनीकरणासाठी (Fresh, 1st & 2nd Renewal) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने www.scholarship.gov.in या संकेतस्थळावरुन अर्ज करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत केंद्रशासनाने **दि. ३०/१०/२०१७** निर्धारित केलेली आहे.

२) ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या Top 20th Percentile merit list मध्ये समावेश असेल, त्याच विद्यार्थ्यांचे नवीन मंजूरी (Fresh) शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन (Online) भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

३) विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत आधारकार्ड असणे आवश्यक आहे व त्याचा आधार क्रमांक हा त्याच्या बँकखात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे.

४) तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्यांच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र ईत्यादी यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

५) नवीन मंजूरीचा तसेच प्रथम व द्वितीय नूतनीकरणाचा ऑनलाईन अर्ज करण्याच्या विस्तृत पध्दतीसाठी www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार आहे.

६) तसेच संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या सी.एस.एस. शिष्यवृत्तीबाबत सूचनांचे अवलोकन करावे.

७) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेले अर्ज महाविद्यालय / संस्थेने छाननी करुन त्वरीत ऑनलाईन फॉरवर्ड करण्यात यावे. अंतिम मुदतीची वाट पाहू नये.

- **शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Offline Renewal) -**

१) शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठी मागील वर्षीच्या परीक्षेत किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.
२) तृतीय व चतुर्थ नूतनीकरणासाठी (3rd & 4th Renewal) विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीच्या नूतीनकरणासाठीचा अर्ज www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करावा व परिपूर्णरित्या भरुन आवश्यक त्या कागदपत्रासह महाविद्यालयाकडे दिनांक २०/१०/२०१७ पर्यंत जमा करावा.
३) महाविद्यालयाने सदर अर्जाची छाननी करुन शिष्यवृत्तीसाठी पात्र अर्ज दिनांक ३०.१०.२०१७ पर्यंत सहसंचालक कार्यालयाकडे जमा करावेत.
४) संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाने पात्र विद्यार्थ्यांची विहीत नमून्यातील यादी उच्च शिक्षण संचालनालयास दि. १५.११.२०१७ पर्यंत जमा करावी.
५) सहसंचालक कार्यालयांनी संचालनालयास विहीत मुदतीत अर्ज सादर न केल्याने व संबंधित विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सहसंचालक कार्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०१७-१८ च्या मार्गदर्शक तत्वांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल. आपल्या अधिनस्त महाविद्यालयात / संस्थेत शिक्षण घेत असणाऱ्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी व बँकखाते आधार संलग्न करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. अर्जदाराच्या सोयीसाठी मार्गदर्शक सूचना व अर्जाचा नमुना www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

आपल्या अधिनस्थ महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांचे स्तरावरुन सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी विभाग प्रमुखांना परिपत्रकाद्वारे तसेच कार्यशाळा, बैठका आयोजीत करुन सूचना देण्यात याव्यात व सदर कार्यशाळेत सर्व विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढण्यासाठी महाविद्यालयांनी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून महाविद्यालयांत कॅम्प आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. झालेल्या कार्यशाळा, बैठका आयोजित केल्याबाबतचे इतिवृत्त या संचालनालयास सादर करण्यात यावे.

(डॉ. वि. रा. मोरे)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
३. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे ०५
४. संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई ०१
५. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
६. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (कृषी/अकृषि/तंत्र/पशुविज्ञान/आरोग्य विज्ञान)
८. प्रबंधक, नर्सिंग कॉन्सिल, मुंबई